सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६/४७६,
ई-मेल-desk16@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**E-Office File No. DTEM-D160STAT/3/2025-DESK16**
महत्वाचे/ कालमर्यादा

१ २ ऑगस्ट २०२५

प्रति,

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर.

**विषय :- १४ ऑगस्ट हा दिवस "विभाजन एक विभिषिका दिन" म्हणून साजरा करणेबाबत.**

संदर्भ- १. Hon. Joint Secretary, Department of school education & literacy, New Delhi, GoI Letter No. D.O.No 17-32/2024-Coord, date-09.08.2024.
2. Hon. Director-P&AP, AICTE, Letter No. AICTE/P&AP/Circular/2024, date-07.08.2024

उपरोक्त विषयाच्या अनुसरुन, मा. पंतप्रधान, श्री. नरेंद्र मोदी, यांनी १५ ऑगस्ट २०२१ रोजी लाल किल्ल्यावरून आपल्या भाषणात १४ ऑगस्ट या दिवसास "विभाजन एक विभिषिका स्मृतिदिन" (Partition Horrors Remembrance Day) म्हणून साजरा करण्याची घोषणा केली होती. संदर्भिय पत्रांचे अवलोक करावे.

२. १४ ऑगस्ट हा दिवस भारताच्या इतिहासातील सर्वात मोठ्या लोकवस्ती विभाजनाच्या संदर्भात लाखो भारतीयांच्या विस्थापनाची आठवण करून देतो, ज्यामध्ये असंख्य लोकांचे प्राण गेले आणि कोट्यावधी लोकांनी आपल्या घरादाराचा त्याग केला. या दिवशी लोकांनी दिलेल्या बलिदानाची आणि विभाजनाच्या वेळी झालेल्या वेदना, त्रास व दुःख यांना उजाळा देणे आणि सदर दिवसाच्या इतिहासाची युवकांना जाणीव व्हावी म्हणुन दरवर्षी १४ ऑगस्ट हा दिवस "विभाजन एक विभिषिका स्मृतिदिन " म्हणुन साजरा करण्याचे आवाहन केले आहे.

३. या पार्श्वभूमीवर, नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा (NSD) यांच्यातर्फे एक विशेष नाटक तयार करण्यात आले आहे. सदर नाटक विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता वाढवण्यासाठी आणि विभाजन काळातील घटनांची समज निर्माण करण्यासाठी तयार करण्यात आले आहे. या नाटकाची इंग्रजी व हिंदी भाषेतील लिंक विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सोबत जोडलेल्या पत्रामध्ये नमूद करण्यात आलेली आहे.

४. तरी संदर्भिय पत्रान्वये प्राप्त निर्देशानुसार, आपल्या अधिनस्त सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनानुदानित पदवी/पदविका अभ्यासक्रम राबविणा-या सर्व संस्थांना त्यांच्या संकेतस्थळावर सदर नाटकाची लिंक अपलोड करुन प्रसारित करण्याची कार्यवाही करावी. जेणेकरून सर्वांना त्याचा सहज उपयोग करता येईल. तसेच, संदर्भिय पत्रामधील निर्देशानुसार, पत्रातील नमुद प्रदर्शने व कार्यक्रम आयोजित करण्यात यावे.

**(डॉ. विनोद म. मोहितकर)**
**संचालक,**
**तंत्रशिक्षण संचालनालय म. रा., मुंबई.**

प्रत कार्यवाहीकरिता-

सर्व प्राचार्य, शासकीय/ अशासकीय अनुदानित/विनानुदानित पदवी/पदविका अभ्यासक्रम राबविणा-या संस्था.

c:\users\dell-pc\downloads\letter to r o (2) (2).doc